# आष्टीच्या आ. सुरेश धस बीड नगर परिषदेमध्ये हस्तक्षेप का?काय साध्य करायचय हे धसानी सागाव?


MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात


- लायकी नसणाऱ्या गणेश पगारेला बीड न.प मध्ये बदली करण्यासाठी आ. सुरेश धस, संदीप क्षिरसागर निता अंधारेनी दिलं शिफारस पत्र.
- कोट्यावधीचा भ्रष्टाचारात अप्रत्यक्ष आ. सुरेश धस, आ. संदीप क्षीरसागर याचा हस्तक्षेप समजायचां का?
- आष्टीच्या आमदारांनी बीड नगरपरिषद मध्ये स्वत:चे कार्यकर्ते पोसण्यासाठी हस्तक्षेप केला बीड शहरातील अनेक कार्यकर्त्यांच्या तोंडून चर्चेला उदान?


बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –१५० | शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -150 | FRIDAY DT.14 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4





## पालकमंत्री अजित दादा,गणेश पगारेला बदलीसाठी आ. सुरेश धस, संदीप क्षिरसागर निता अंधारेनी शिफारस पत्र का दिले एकदा त्याना विचाराल का?

**आष्टीचे आमदार सुरेश धस व बीडचे आमदार संदीप क्षीरसागर व बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारेनी बीड नगर परिषदेमध्ये भ्रष्टाचाराने बरबटलेल्या गणेश पगारेला बदलीसाठी शिफारस पत्र दिलेलं असतानाच मात्र**

**स्वच्छता कर्मचारी यांच्याकडून पगार काढता छोटे मोठे शासकीय बिल असेल तर टक्केवारी सुद्धा गणेश पगार घेतो टक्केवारी सेवानिवृत्तीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना अरेरावी आणि मानसिक त्रास देण्यामध्ये गणेश पगारचा व सिओ निता अंधारेचा सिंहाचा वाटा आहे. निता अंधारे, गणेश पगारे स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या तळतळाटपासून वाचू शकणार नाहीत**

गणेश पगारेना वारसाहक्क नाहीच पण त्याने बीड नप या ठिकाणी गणेश पगारे ने स्वतःची मुलगा आणि मुलगी बीड नगर परिषद मध्ये लावलेले आहेत गणेश पगारेनी नोकरीचा धंदा मांडलेला असताना आमदार सुरेश धस संदीप क्षीरसागर यांनी गणेश पगारेला बीडमध्ये टक्केवारी घेऊन पैसे कमवण्यासाठी आष्टीचे आमदार सुरेश धस व बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी गणेश पगारेला पाठीशी घालण्याचा पाप केलेलं आहे. बीड शहरातील जनतेला त्रस्त करण्यामध्ये गणेश पगारे व निता अंधारे च्या माध्यमातून बीडच्या जनतेला त्रास देणाऱ्या संदीप क्षीरसागर व सुरेश धस यांचा बीडच्या नागरिकाकडून निषेध व्यकत होत आहे.

बीड /प्रतिनिधी

भ्रष्टाचाराने बरबटलेला शेकडो तक्रारी असलेला पदावर बसण्याची लायकी नसताना सुद्धा गणेश पगारे नावाच्या क दर्जाच्या कर्मचाऱ्याला बीड नगर परिषदेचा अकाउंट देण्यासाठी भ्रष्टाचाराच्या वाटीमध्ये

चमच्याने शेण खाणाऱ्या गणेश पगारेसाठी आमदार सुरेश धस, संदीप क्षिरसागर, बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी बदलीसाठी शिफारस पत्र दिले संदीप क्षीरसागर आणि या अगोदर सुद्धा गणेश पगारे हा भ्रष्टाचारातील महामेरू आहे आणि बीड नगर परिषदेचा अकाउंटचा पदभार असलेला गणेश पगारीची लायकी नसताना कर्मचाऱ्याला बीड नगर परिषद अकाउंटंट चाचणी देतील टक्के आमदार संदीप क्षीरसागर सुरेश धस यांनी तर बीड नगर परिषदेमधून टक्केवारी मिळविण्यासाठीच गणेश पगारीला व नेता अंधारेला भिडला मिळून दिली आहे अशी चर्चा नागरिकांमध्ये होत असतानाच मात्र आता गणेश पगारांनी स्वतःच्या लेकरांना स्वच्छता कर्मचारी म्हणून त्या ठिकाणी मुलगा व मुलगी यांना संदीप क्षीरसागर यांना विचारूनच ही नोकरी दिली असल्याचेही चर्चा सध्या बीड शहरांमध्ये व बीड नगर परिषदेमधील अर्थात कर्मचाऱ्यांमध्ये ऐकायला मिळत आहे तर या अगोदर संदीप क्षीरसागर यांनी गणेश पगारीची बदली व्हावी म्हणून पत्र दिले होते गणेश पगारे भ्रष्टाचार आहे म्हणून तक्रार दिली होती परंतु आता संदीप क्षीरसागर यांनी व सुरेश धस आष्टीचे आमदार यांनी या ठिकाणी गणेश पगारेला बदलीसाठी शिफारस पत्र देत असताना धक्कादायक माहिती समोर आली आहे की बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी गणेश पगारे ला बीड नगर परिषदेमध्ये येण्यासाठी शिफारस पत्र दिलं होतं शिफारस बदली आमदार सुरेश धस संदीप क्षीरसागर व नीता अंधारे यांच्या विनंती पत्रावरून शिफारस दिलीच कशी असा सवाल या ठिकाणी होत आहे यांचे पत्र नेमके आर्थिक तडजळीमध्ये गणेश पगारीला बसून अकाउंटंट च्या चाव्या हातात देऊन त्यासाठी आमदार सुरेश धस संदीप क्षीरसागर यांनी गणेश पगारीला बीडला अनेक गुगल गणेश पगारेच्या माध्यमातून शिव अनिता अंधारे संदीप क्षीरसागर यांनी काढलेले आहेत अशी चर्चा बीड नगर परिषदेमधील कर्मचाऱ्यांमधून व बीडची जनता चर्चा कलत आहे.

स्वच्छता कर्मचारी यांच्याकडून पगार काढता वेळेस साधीसुधीला बिलं काढताना टक्केवारी सुद्धा गणेश पगार घेतो टक्केवारी सेवानिवृत्तीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना आणि रावी आणि मानसिक त्रास देण्यामध्ये गणेश पगारेचा सिंहाचा वाटा आहे निता अंधारे गणेश पगारे स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या ताटापासून वाचू शकणार नाहीत

गणेश पगारे याना वारसाहक्क नाहीच वारस हक्क नाही पण त्या ठिकाणी गणेश पगारे ने स्वतःची मुलगा आणि मुलगी बीड नगर परिषद मध्ये लावलेले आहेत गणेश पगाऱ्यांनी नोकरीचा धंदा मांडलेला असताना आमदार सुरेश धस संदीप क्षीरसागर यांनी गणेश पगारेला बीडमध्ये टक्केवारी घेऊन पैसे कमवण्यासाठी आष्टीचे आमदार सुरेश धस व बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी गणेश पगारेला पाठीशी घालण्याचा पाप केलेलं आहे. बीड शहरातील जनतेला त्रस्त करण्यामध्ये गणेश पगारे व निता अंधेराच्या माध्यमातून बीडच्या जनतेला त्रास देणाऱ्या आ. संदीप क्षीरसागर व आ. सुरेश धस यांचा बीडच्या जनतेकडून निषेध होत आहे

- **गणेश पगारे च्या माध्यमातून आमदार सुरेश धस संदीप क्षीरसागर टक्केवारी मध्ये मिंदे नागरिकांतून चर्चा?**
- **वर्ग अ, ब,क श्रेणी पैकी क, श्रेणी वर्गाला अकाउंट चा चार्ज भ्रष्टाचार गणेश पगारेलाच का पदभार देण्यात आला आ. सुरेश धस आ. संदीप क्षीरसागर सिओ. निता अंधारे नी जनतेला उत्तर द्यावे. महाराष्ट्र शासनाकडे बीडला देण्यासाठी उत्कृष्ट दर्जाचा अकाउंट नाही का.!**
- **पण सिओ नीता अंधारे यांना शोधून सुद्धा बीड नगर परिषदेसाठी उत्कृष्ट अकाउंटंट नीता अंधारेना मिळता मिळेना!**
- **जिल्हाधिकारी गणेश पगारे वरती गुन्हा दाखल करण्यासाठी परवानगी का देत नाहीत. बीड शहरातील नागरिकांमध्ये चर्चा?**
- **जिल्हाधिकारी यांच्याकडे गणेश पगारेच्या विरोधात तक्रारीचे ढिगारेच ढिगारे असताना सुद्धा प्रशासक कविता जाधव या गप्प का?**

### गणेश पगारेच्या अनेक तक्रारीवर जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल मागवला परंतु मुख्याधिकारी निंता अंधारेनी का दिला नाही?

बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारदाराने गणेश पगारे वरती गुन्हा दाखल करण्यासाठी परवानगी मागितलेली आहे बीडचे जिल्हाधिकारी यांनी बीड नगरपरिषदा वारंवार या प्रकरणातला अहवाल सादर करावा म्हणून पत्र व्यवहार केलेला आहे परंतु गणेश पगाराच्या विरोधामधील तक्रारदाराच्या चौकशीचा अहवाल बीड नगर परिषदेच्या नीता अंधारे व संबंधित चौकशी समितीतील अधिकारी कर्मचारी अहवाल बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे का दाखल करत नाहीत गणेश पगारेला वाचविण्यासाठी नीता अंधारे का धरपळ करत आहेत तर गणेश पगारीला बीडला आणण्यासाठी व प्रशस्तीपत्र देण्यासाठी नीता अंधारींना पत्र द्यायला वेळ आहे परंतु अहवाल द्यायला वेळ का नाही का असे नागरिकांमध्ये बोलले जात आहे.



कै.अंबादास गाडे यांचा मुलगा चि.सतिश व कै.सावळाराम काकडे यांची मुलगी चि.सौ.का.शितल यांचा शुभ विवाहप्रसंगी सदिच्छा भेट घेताना मा.जि.प.सदस्य तथा काँग्रेस तालुकाध्यक्ष रविकाका ढोबळे, उपसरपंच सोमा लगड,नवनाथ शेळके,पत्रकार किरण जावळे,आबा बळे, विठ्ठल खाडे,मिलिंद काकडे,थोरवे मामा,छगन कर्डिले,नामदेव मामा शेळके,काकासाहेब कर्डिले,आदी उपस्थित होतो



आष्टी पंचायत समितीचे नवनिर्वाचित गट विकास अधिकारी बागलाने साहेब यांचा सत्कार करताना पिंपरी येथील आदर्श सरपंच मोहन आमटे घाटा येथील सरपंच प्रल्हाद मुळीक ग्रामसेवक भवर पाटण सांगवी येथील सरपंच दत्तात्रेय आबा खोटे यशोचित सत्कार केला त्याचे छायाचित्र छायाचित्र सुरेश कांबळे आष्टी

# ना. पंकजाताई मुंडे यांनी नागपुरात घेतला नागनदी प्रकल्पाचा आढावा

## सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी शेतीसाठी वापरयोग्य करण्याच्या दिल्या सूचना

नागपूर (प्रतिनिधी)

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज नागनदी प्रकल्पाचा आढावा घेत शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी शहरातील उद्याने (गार्डन), स्टेडियम व शेतीसाठी वापरयोग्य करण्याचे निर्देश देऊन कामाचे वेळापत्रक तयार करून त्याप्रमाणे अमलबजावणीच्या सूचना केल्या.




मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील आयुक्त सभाकक्षात सदर आढावा बैठक झाली. यावेळी पर्यावरण विभागच्या प्रधान सचिव वनिता सिंगल, मनपा आयुक्त आणि प्रशासक डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपिन ईटनकर, अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल, अति. आयुक्त अजय चारठाणकर, मुख्य अभियंता श्रीमती लीना उपाध्याय, उपायुक्त श्रीमती विजया बनकर, विजय देशमुख, अधीक्षक अभियंता श्रीमती डॉ. श्वेता बॅनर्जी, श्री मनोज तालेवार, मुख्य स्वच्छता अधिकारी श्री डॉ. गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता राजेश दुफारे, श्रीकांत वायकर, नागनदीचे तांत्रिक सल्लागार मो. इजराईल, प्रोजेक्ट मॉनेटरींग कॉन्सीलचे प्रकल्प व्यवस्थापक अबु, उपप्रकल्प व्यवस्थापक डॉ. श्रीनिवास राव, आंतरराष्ट्रीय पर्यावरण तज्ञ अजित सवदी, प्रोक्युरमेंट तज्ज्ञ पूर्णचंद्र राव यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम ना. पंकजाताई मुंडे यांचे स्वागत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांनी केले.यावेळी मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी नागनदी प्रकल्पाची पूर्ण माहिती दिली. नागनदी प्रकलपावर केंद्र राज्य, आणि मनपा यांच्या सहभागातून एकून १९२६.९९ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. याकरिता केंद्र सरकारतर्फे ११५६.१४ कोटी, राज्य सरकारतर्फे ४८१.७३ कोटी, मनपा २८९.०२ खर्च करणार आहे. या प्रकल्पावर जपानची जायका कंपनी मदत करीत आहे.

नागनदीवर एसटीपी वाढ करणे आणि अद्यावतीकरण, पाण्याची गुणवत्ता राखणे, नदीमधील प्रदुषण कमी करणे, उत्तर आणि मध्य भागात सिवरेज लाईन नेटवर्क बदल करणे, नवीन सिवरेज लाईन टाकणे, प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहण करणे, जैवविविधता सुधारणे, लोकांचे आरोग्य सुधारणेसाठी प्रयत्न करण्यात येत आहे. याशिवाय महानगरपालिकातर्फे ५ वर्षात पाच पॅकेजमध्ये नागनदी पुनरुजीवन करण्यात येणार असल्याचेही डॉ. चौधरी यांनी सांगितले.

# कामातील अनियमितता व निकृष्ट कामाबाबत न्यायालयाकडून शासनास नोटीस

## मनसेचे कैलास दरेकर यांनी दाखल केली होती जनहित याचिका

आष्टी (सुरेश कांबळे)

आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यात सन २०२२ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत झालेल्या पूरहानी दुरुस्ती,एफ.डी.आर.,ए.एम.सी. कामामध्ये कोट्यावधीचे कामे करण्यात आलेली आहेत परंतु हि कामे नेमकी कोणत्या ठिकाणी केली गेली व या काम मध्ये कंत्राटदार कोण व या कामाबाबतची निविदा कोणत्या दैनिकात प्रसिद्ध करण्यात आली याची माहिती नसल्याने जिल्ह्यासाठी नेमका किती निधी आला होता याची माहिती जनतेला नाही तसेच पशुवैद्यकीय दवाखानाच्या नवीन इमारती साठी २ कोटी ५० लाख रुपया पैकी ८० ते ९० टक्के रक्कम अदा करूनही अद्यापपर्यंत हे काम पूर्ण झालेले नाही तसेच वांजरा फाटा ते कुसलंब रस्ताही अपूर्ण स्थितीत आहे. व वरील कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले असल्यामुळे कैलास दरेकर जिल्हाध्यक्ष शेतकरी सेना मनसे बीड यांनी संबंधित विभागाला निवेदन देऊन सदरील कामाची विभागीय गुणनियंत्रक पथकामार्फत तपासणी करावी अशी मागणी केली. परंतु वेळोवेळी निविदने देऊनही अद्याप पर्यंत हि तपासणी न झाल्यामुळे व दोषीवर कारवाई न झाल्यामुळे कैलास



दरेकर जिल्हाध्यक्ष शेतकरी सेना मनसे बीड यांनी मा. उच्च नायायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र. ७२/२०२४ ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्या मार्फत दाखल केली होती.

सदरील याचिकेची सुनावणी दि. १०.०२.२०२५ रोजी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद झाली असता मा. न्यायमूर्ती मंगेश एस. पाटील व न्यायमूर्ती प्रफुल्ल एस खुबलकर यांच्या समोर झाली असता मा. न्यायालयाने सदरील जनहित याचिकेत प्रतिवादी १. सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई २. अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग धाराशिव ३. उपअधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद ४. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड ५. उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग आष्टी जि. बीड ६. उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पाटोदा जि. बीड ७. उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग शिरूर का. जि. बीड यांना नोटीस काढल्या असून याचिकेची पुढील सुनावणी दि. ०३.०३.२०२५ रोजी ठेवली आहे.याचिकाकर्त्याच्या वतीने ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी काम पहिले तर त्यांना ड. राकेश ब्राम्हणकर ड. सोनाली गणेश सोमवंशी ड. गौरव शिवाजी खांडे ड. रवींद्र बी. वानखेडे यांनी सहकार्य केले तर शासनाच्या वतीने ड. एस. आर. वाकळे यांनी काम पहिले.

# देवपिंपरी येथील वीस वर्षीय तरुणाचा अपघातात मृत्यू

## पोलिसांत अकस्मिक मृत्यूची नोंद; पुढील तपास सुरु

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई, दि.१४ : छत्रपती संभाजीनगर येथे नातेवाईक यांना भेटण्यास गेलेल्या गेवराई तालुक्यातील देवपिंपरी येथील एका वीस वर्षीय युवकाचा धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या अपघातात मृत्यू झाल्याची घटना काल बुधवारी दुपारी घडली. कृष्णा अंबादास गवारे (वय-२०) रा. देवपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड असे या अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव आहे. बुधवारी तो छत्रपती संभाजीनगर येथे नातेवाईक यांना भेटण्यासाठी स्कुटीवरून धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून जात असताना त्याच्या स्कुटीला आज्ञात वाहनाने धडक दिली. त्यात कृष्णा गवारे हा बेशुद्ध झाला.बेशुद्ध अवस्थेतील दिसलेला युवक पहाता शहरातील नागरिकांनी १०८ नंबरवर फोन केला. यामुळेच घटनास्थळावर रुणवाहिका दाखल होऊन बेशुद्ध कृष्णाला घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगीतले. त्याच्या पश्चात आई-वडिल, एक बहिण असा परिवार असून, कृष्णा हा एकूलता एक असल्याने गवारे कुटुंबीयावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. कृष्णाच्या अपघाती मृत्यूने देवपिंपरी गावातील नागरिकांकडून हळहळ व्यक्त होत आहे.



# फुले एज्युकेशन तर्फे महिला शिक्षक दिन सुरू केल्याबद्दल तेलंगणा राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.भट्टी विक्रमारका मालू सन्मानित

हैद्राबाद. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त या वर्षी पासून तेलंगणा राज्यात सावित्रीबाई फुले यांनी देशात महिलांना शिक्षण सुरू करीत सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात अलौकिक असे महान कार्य केले त्या कार्याचा वसा वारसा विचार पुढील पिढीला प्रेरणादायी मिळत राहो म्हणून त्यांचा जन्म दिवस ३ जानेवारी हा भारतात प्रथम तेलंगाना राज्याने ३ जाने.२५ पासून सर्वत्र लागू करून तसा शासकीय निर्णय काढून सर्व ठिकाणी महिला शिक्षक दीन मोठ्या दिमाखात विविध कार्यक्रमाने साजरा केला म्हणून राज्याचे मुख्यमंत्री मा.ना. रेवंत रेड्डी यांना आम्ही १० ऋशल २५ भेटीचे वेळ मागितली तरी देखील त्यांनी दिली होती परंतु विधान परिषद निवडणूक कामामुळे अचानक मीटिंग ला गेल्याने आमच्या ४ राज्याचे प्रमुख प्रतिनिधी व फुले शाहू आंबेडकर एज्युकेशनल अँड सोशल फाउंडेशन च्या वतीने महात्मा फुले प्रजा भवन हैद्राबाद येथे दि.१० फेब्रुवारी २०२५ रोजी स.११ वाजता तेलंगणा राज्याचे उप मुख्यमंत्री मा.ना.भट्टी विक्रमारका मालू यांना महात्मा फुले पगडी घालून, उपरणे आणि महात्मा फुले समग्र वाडमय,आम्ही पाहिलेले फुले आणि दिनांची साउली महात्मा फुले गीत चरित्र , लेखक रघुनाथ ढोक लिखित मराठी,हिंदी,इंग्रजी व जर्मन भाषेतील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले ग्रंथ व मराठी तेलगू भाषेतील सत्यशोधक विवाह माहिती पुस्तक,फुले दाम्पत्य फोटो फ्रेम भेट देऊन सावित्रीबाई फुले यांचे वारस डॉ.दिलीप नेवसे,अखिल भा.माळी महासंघाचे अध्यक्ष विलास पाटील, कार्याध्यक्ष शिवदास महाजन, तेलंगणा राज्याचे प्रा.सुकुमार पेटकूले , महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन चे सत्यशोधक रघुनाथ ढोक व गुजरात चे डॉ.शामराव फुले मध्यप्रदेश चे कैलास वाघेला यांनी सन्मानित केले.

यावेळी प्रगती भवन चे नाव महात्मा फुले प्रजा भवन नाव दीलेबध्दल सर्व प्रतिनिधींनी सरकारचे अभिनंदन करीत शालेय शिक्षण पद्धतीमधे सर्व मुलांना प्रेरणा मिळावी म्हणून फुले दाम्पत्य यांचे जीवन,कविता तसेच इतर महापूर्षांचे धडे असावीत अशी मागणी देखील केली. यावेळी ऑफिस मद्ये जास्त प्रतिनिधीना भेट देऊ शकत



नसल्याने उप मुख्यमंत्री यांनी सर्वांना भेटण्यासाठी आवरजूंन बाहेर येऊन सर्व प्रतिनिधी सोबत सन्मानाचा स्वीकार करीत सर्वांचा परिचय घेऊन फोटो काढले आणि खास चहापान केला त्याबद्दल सत्यशोधक रघुनाथ ढोक यांनी आभार व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी प्रा.सुकुमार पेटकुले, सौ.विनोदां नगोसे, मेंगाजी गुरुनुले,मुरलीधर नगोसे, सतीश गुरूनुले,शभाना शेंडे,नारायण गुरुनुले,गणेश माळी,विनोद गुरुनुले, कृष्णा भेंडारे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# धुनकवाडची मिरा गव्हाणे कर साहाय्यक एनटी बी मधुन महाराष्ट्रात दुसरा क्रमांक

## धुनकवाड येथील पहिली एमपीएससी पास विद्यार्थीनी

वडवणी/ प्रतिनिधी

धुनकवाडची मिरा प्रभाकर गव्हाणे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेत कर साहाय्यक म्हणून उत्तीर्ण झाली असुन एनटी बी मधुन महाराष्ट्रात दुसरा क्रमांक मिळवला आहे.अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिरा गव्हाणे ह्या विद्यार्थीनीने आपल्या मेहनतीने कष्टाने हे यश संपादन केले असुन आपल्या आई वडिलांसह कुटुंबाचे व आपल्या गावाचे नावलौकिक केले आहे.धुनकवाड गावाच्या गौरवशाली इतिहासात आणखी एक मानाचा तुरा मिळवला आहे.मिरा गव्हाणे ही धुनकवाड येथील पहिली एमपीएससी परिक्षेत उत्तुंग भरारी घेणारी ही मुलगी आहे.




कु.मिरा गव्हाणे ही गेल्या सहा महिन्यांपूर्वी वनविभागात रायगड जिल्ह्यातील वनक्षेत्र महाड येथील वनपरिमंडळ बिरवाडी येथे दहिवाड बिटला वनरक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे.ही नोकरी करत असताना एवढ्यावरच न थांबता ती एमपीएससीचा ती अभ्यास करत होती या आधीही अनेक परिक्षा देऊन आपल्याला या पेक्षा मोठ्या पदावर जायचं हे स्वप्न उराशी बाळगून मेहनत घेऊन प्रयत्न करत होती आणी अखेर तिच्या या प्रयत्नांना यश आले आहे.कु.मीरा प्रभाकर गव्हाणे हिची चझडउ मार्फत घेण्यात आलेल्या ींर् रीीळींरपीं(कर साहाय्यक) या परिक्षेत छढइ मधुन महाराष्ट्र रँक २पव आणि महसूल सहाय्यक या दोन्ही पदावर उत्तीर्ण झाली असुन ही निवड झाल्याबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.धुनकवाडचे युवा सरपंच भागवत गव्हाणे यांची ती लहान बहीण आहे.

# केज पोलिसांचा नाकारते पुन्हा एकदा उघड

## ढाकणवाडीत महिलेच्या घरावर दगडफेक करत केली मारहाण केज पोलिसांकडून कारवाई शून्य

बीड (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील ढाकणवाडी, तालुका केज, जिल्हा बीड येथील विधवा महिला लता तुकाराम ढाकणे यांच्या घरावर दगडफेक करून मारहाण करण्यात आली. दगडफेक करणारे गावातील शेजारचे लोक होते. ही माहिती पोलिसांना फोनवर दिल्यानंतर पोलिसांनी कारवाई करणा अपेक्षित होतं परंतु पण ते केज पोलीस कधीच वेळेवर येत नाहीत. व कारवाई करत नाही. त्यामुळे थेट त्या विधवा महिलेने बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवीनत कॉवत यांच्याकडे धाव घेतली. झालेला अन्याय दूर करण्याची अपेक्षा व्यक्त ज्यांनी घरावर दगडफेक केली मारहाण केली त्यांच्यावर गुन्हे दाखल करा अशी मागणी देखील केली आहे. केज तालुक्यातील ढाकणवाडी येथे एक विधवा महिला लता तुकाराम ढाकणे ह्या रहिवासी आहेत. त्यांची ढाकणवाडी येथे थोडी शेती आहे. शेतीवर भागत नाही, त्यांचा मुलगा कृष्णा तुकाराम ढाकणे या मारहाणी व दगडफेकी मुळे भीतीपोटी अनेक दिवसापासून गाव सोडले आहे. मुलगा बाहेरगावी कामाला असतो. शेजारील भावकीतील लोक त्यामध्ये नारायण संपत ढाकणे, संपत त्रंबक ढाकणे, गोकुळ काशिनाथ ढाकणे, विभीषण काशिनाथ ढाकणे, गोकुळ मनोहर हांगे, उत्तरेश्वर भीमराव हांगे, अभिमान रमेश भांगे, आसराबाई रमेश भांगे, निर्गुणा अभिमान भांगे, शितल उत्तरेश्वर हांगे, सोनाली संपत ढाकणे, चंद्रकला सुभाष ढाकणे, कुसुम भीषण ढाकणे, दिपाली गोकुळ ढाकणे, भागाबाई



काशिनाथ ढाकणे, हे सर्वजण जाणीवपूर्वक या विधवा महिला शेतकरी यांना त्रास देत आहेत.शेजारचे लोके भावकितीला असल्याने एकट्या लताबाई तुकाराम ढाकणे यांना त्रास देत आहेत, शेतात लावलेल्या पिकाचे नुकसान, झाडाचे नुकसान करणे, पाईपलाईट फोडणे असा मानसिक त्रास देणे सातत्याने दर दिवस सुरू आहे. शेतात केलेल्या पाईपलाईन तोडफोड व पिकाचे नुकसान भरपाई देखील देण्यात यावी. अशी मागणी त्यांनी केली आहे. केज पोलीस स्टेशन येथे अनेकवेळा तक्रार देऊन ही कारवाई केली गेली नाही.

१० जानेवारी २०२५ रोजी दुपारी तीन च्या दरम्यान त्या घरीच होत्या त्यांच्या भावकीतील नारायण संपत ढाकणे याने घरावर तुफान दगडफेक केली. त्यामुळे त्यांनी भीतीपोटी घराचा दरवाजा बंद केला व आत मधून पोलिसांना फोन केला. ते केज पोलीस त्यांनी कसल्या प्रकारचे उत्तर दिले नाही. या प्रकरणी भेटही दिली नाही कारवाई करणे तर दूरच म्हणून थेट बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची भेट घेऊन झालेल्या अन्य अत्याचार व दगडफेकीची हकीकत सविस्तरपणे सांगितली. व ती एस पी यांनी ऐकूनही घेतली.त्यांनी बीड च्या एसपी यांच्याकडून न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. जर न्याय न मिळाला तर मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेणार असल्याचे सांगितले.

# शिक्षक सक्षमीकरण प्रशिक्षणाचे उर्वरित टप्पे १२ वी आणि १० वी परीक्षा संपल्यानंतर घ्या

मुंबई (प्रतिनिधी)

शिक्षक सक्षमीकरण प्रशिक्षणाचे उर्वरित टप्पे १२ वी आणि १० वी च्या परीक्षा संपल्यानंतर घ्यावे अशी मागणी बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार राज्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता विषयक विविध उपक्रमापैकी राज्यातील शिक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण हे इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या वर्गासाठी विविध टप्प्यानुसार आयोजित करण्यात आलेले आहे . त्यासाठी शाळेच्या स्तरावरून शिक्षकांना कार्यमुक्त करण्याचे आदेश मुख्याध्यापकांना प्राप्त झाले आहेत . परंतु




## बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाची मागणी

सदरील प्रशिक्षणासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना कार्यमुक्त करण्यास मुख्याध्यापकांना अडचणी येत आहेत .सध्या इयत्ता बारावीच्या आणि दहावीच्या तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेतील विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाइन भरणे सुरू आहे . तसेच बारावीची परीक्षा दि .११ /२/२०२५ पासून सुरू झाली आहे त्यामुळे प्राध्यापकांना परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षणासाठी कार्यमुक्त करून पाठविलेले आहे .दि . २१/२/२०२५ पासून एस .एस .सी . परीक्षा सुरू होत असल्यामुळे परीक्षेत पर्यवेक्षणासाठी कर्तव्यावर शिक्षक असताना प्रशिक्षणासाठी कोणते शिक्षक पाठवायचे हा मोठा गंभीर प्रश्न मुख्याध्यापकापुढे निर्माण झाला आहे . त्यामुळे परीक्षा कामकाज व प्रशिक्षण यासाठी अडचणी येत आहेत व गोंधळ निर्माण झाला आहे . त्यामुळे प्रशिक्षणाचे उर्वरित टप्पे रद्द करून ते एच . एस .सी . व एस . एस . सी . परीक्षा संपल्यानंतर आयोजित करावे अशी मागणी बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने करण्यात आली आहे . याबाबतचे निवेदन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नागनाथ शिंदे यांना जिल्हाध्यक्ष तथा विभागीय सचिव प्राचार्य पैठणे जे . एम ., जिल्हा सचिव विष्णुपंत रसाळ, मुख्याध्यापक रमेश बागलाने , चव्हाण सर, मात्रे सर इत्यादींनी दिले. तसेच निवेदनाची प्रत ईमेल द्वारे संचालक

# राष्ट्रीय समाज पक्ष कार्यकर्ता मेळावा शिरसाळा येथे संपन्न




सिरसाळा येथे राष्ट्रिय समाज पक्ष कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्यामध्ये राष्ट्रिय समाज पक्ष बीड महिला आघाडी जिल्हाध्यक्ष पदी सौ. किरण डोळस यांची फेर निवड करण्यात आली. ही निवड पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रा.विष्णु गोरे सर, जिल्हाध्यक्ष कपीलभाऊ गाडेकर , जिल्हाध्यक्ष साईनाथ विघ्ने, लोकसभाध्यक्ष विक्रम बप्पा सोनसळे व नवनिर्वाचित युकव आघाडी जिल्हाध्यक्ष बालाजी काळे, वडवणी तालुका अध्यक्ष परमेश्वर शिंदे, परळी तालुकाध्यक्ष अप्पा वडगावकर, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष राजेश गडदे सर, वडवणी तालुका संपर्क प्रमुख अतुल कानडे यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आली व यावेळी बीड जिल्हातील सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## अंबाजोगाईत जमीन हडपण्याचे प्रकार वाढले

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

शहर आणि आसपासच्या परिसरातील जमिनीचे भाव दिवसागणिक प्रचंड वाढत आहेत. त्यामुळे भूमाफिया आणि गावगुंडांनी बनावट दस्तावेज करून जमिनी बळकावण्याचा सपाटा लावला आहे. गुंडागर्दी करून धमकावून वेळ प्रसंगी जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करून जमिनीवर कब्जा करण्याचे प्रयत्नही होत आहेत. वेळीच या गुंडांना आवरले नाही तर शांत आणि वास्तव्यासाठी सुरक्षित अशी अंबाजोगाईची असलेली ओळख धूसर होण्याची शक्यता आहे. अशी चर्चा अंबाजोगाईकरात होत आहे.

# बीड मध्ये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांचा मूक मोर्चा

## जिल्हाधिकारी कार्यालय बीड, जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजक विभाग यांना मागणीचे निवेदन



बीड जिल्ह्यातील सर्व मुख्यमंत्री मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजना अंतर्गत सर्व प्रशिक्षणार्थी यांच्या अनेक विभागांमध्ये काम करणाऱ्या मुख्यमंत्री व प्रशिक्षण कार्य यांना शासनाने दिलेल्या सहा महिने प्रशिक्षण काम करणाऱ्या - प्रशिक्षणार्थी यांचा आज बीड येथे भव्य मूक मोर्चा काढण्यात आला या मोर्चाच्या मागण्या पूर्ण होणे गरजेचा आहे ज्या पद्धतीने शासनाने अनेक योजना आणल्या आणि त्या प्रभावीपणे राबवल्या त्याचप्रमाणे प्रशिक्षणार्थी म्हणून जे युवक युवती काम करत आहेत आपल्या न्याय,हक्काच्या मागण्या आज जिल्हाधिकारी कार्यालय जिल्हा परिषद कार्यालय जिल्हा कौशल्य विभाग यांच्या वतीने मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आल

आम्ही सर्व शिकाऊ युवा प्रशिक्षणार्थी आपणास विनंती करतो की, महाराष्ट्र शासनाच्या सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना च्या अंतर्गत आम्ही सर्व शिकाऊ प्रशिक्षणार्थी म्हणून बीड जिल्ह्यामध्ये विविध आस्थापना मध्ये विशिष्ट पदावर रुजू झालेले आहोत.तसेच वरील संदर्भाच्या अनुषंगाने प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार संबधित उद्योग, आस्थापना निर्णय घेतील असा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे प्रशिक्षणार्थी यांच्या संदर्भात शासनाने तसा निर्णय घेण्या संबधित आस्थापना यांना आदेशित करून संबधित युवक-युवती यांना रोजगार देण्याच्या दृष्टीने व्यवस्था होईल.प्रमुख मागण्या खालीलप्रमाणेआहेत

१. प्रशिक्षणार्थी यांचा कार्यकाळ वाढवण्यात यावा.

२. विद्यावेतन मध्ये वाढ करण्यात यावी.

३. युवा प्रशिक्षणार्थी यांना शासकीय सेवेत १५% आरक्षण देण्यात यावे.तरी वरील सर्व प्रशिक्षणार्थी यांच्या मागण्या पूर्ण कराव्या जर कार्यकाळ संपण्याअगोदर आमच्या मागण्या न मान्य केल्या मोठा आंदोलन करण्याचा इशारा यावेळेस प्रशिक्षणार्थी यांनी केला



जालना येथे दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी अनुसूचित जाती जमाती राज्य आयोग सदस्य जालना येथे आले असता मातंग आरक्षण क्रांती दल समन्वय समिती च्या वतीने आज अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण लागु करावे तसेच महाराष्ट्र राज्यात उपवर्गीकरण अंमलबजावणी होईपर्यंत कोणतीही शासन नोकर भरती होऊ नये यासाठी मातंग आरक्षण क्रांती दल समन्वय समिती चे समन्वयक ललित कुचेकर यांनी निवेदन सादर केले, यावेळी उपस्थित रविराज पाखरे, संजुबाबा गायकवाड

# पिण्याच्या पाण्यासाठी मनसे आक्रमक !

## तीन दिवस आड पाणी न दिल्यास नगरपालिका विरोधात बोंब मारो आंदोलन !

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पाली येथील धरण व माजलगाव येथील धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असतानाही नगरपालिकेच्या नकारत्यापणामुळे बीड शहरातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती व पैसे मोजावे लागत आहे मात्र नगरपालिकेला जाग येत नसल्याने तीन दिवस आड पाणी न सोडल्यास तसेच शहरातील कचऱ्याचा निपटारा वेळेवर न केल्यास नगरपालिका विरोधात दिनांक २७ फेब्रुवारी रोजी नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात बोंबाबोंब आंदोलन करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र निर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव बिडवे शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. बीड शहराला पाणीपुरवठा करणारे माजलगाव येथील बॅक वॉटर धरण व पाली येथील बिंदूसरा धरणात यंदा चांगला पाऊस झाल्याने मुबलक पाणी साठा उपलब्ध आहे मात्र नगरपालिकेच्या चुकीच्या धोरणामुळे बीड शहरात तब्बल वीस ते पंचवीस दिवस पिण्याचे पाणी येत आहे यामुळे बीड शहरातील नागरिक हैराण झाले आहेत पाणीपट्टी वेळेवर घेणारे नगरपालिका प्रशासन शहरातील नागरिकांना पाणी वेळेवर देणार आहेत का असा सवाल उपस्थित करत शहरातील पाणीपुरवठा तीन दिवस आड सुरळीत न केल्यास बीड नगरपालिकेसमोर पाण्यासाठी बोंबाबोंब आंदोलन करण्यात येणार असल्याचे मनसेकडून सांगण्यात आले आहे या संदर्भात महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला असून उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे मनसेच्या वर्षा जगदाळे, सदाशिव बिडवे ,अमरजान पठाण यांनी आंदोलनाचे निवेदन दिले आहे.



## मस्साजोग येथील व्यापाऱ्याच्या आडत दुकानातील पावटा (राजमा) चोरी छडा स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांनी लावुन

# सात आरोपी निष्पन्न करुन दोन आरोपींना केले जेरबंद करुन एकुण ५,७६,०००/- रु चा मुद्देमाल केला जप्त

मौजे मस्साजोग येथील धनलक्ष्मी ट्रैडर्स येथे दिनांक ३१/०१/२०२५ रात्री ०९.३० वा ते दि.०१/०२/२०२५ रोजीचे सकाळी ०६.०० वा. दरम्यान अज्ञात चोरटयांनी धनलक्ष्मी ट्रॅडर्स गोडाऊनचा पत्रा काढुन राजम्याचे (पावटा) १६५ कट्टे ७,४५,५००/- रु चे व नगदी ७५०००/- रु एकुण ८,१७,५००/- रु मुद्देमाल चोरुन नेला आहे. वगैरे फिर्याद वरुन पो.स्टे.केज येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४३/२०२५ कलम ३३४(१) भा.न्या.सं .प्रमाणे दिनांक ०१/०२/२०२५ रोजी फिर्यादी गणेश डिगांमर गायकवाड , ट्रेडर्स दुकान चालक, रा.मस्साजोग ता.केज यांचे फिर्याद वरुन गुन्हा नोंद झाला होता.

मा.श्री. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक,बीड यांनी सदर गुन्हयाचा उकल करण्यासाठी आदेशीत केले होते त्याअनुषंगाने श्री. उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांनी राजमा चोरी गुन्हयाचा संमातर तपास करुन आरोपींचा शोध घेण्यासाठीआपल्या अधिपत्याखालील पोउपनि महेश विघ्ने यांना आदेश दिले. त्यानंतर पोउपनि विघ्ने यांनी त्यांचे पथकातील अंमलदारसह आरोपीचा शोध घेत असतांना दिनांक १३/०२/२०२५ रोजी गुप्त बातमी मिळाली की, पावटा चोरीचे कट्टे हे रमेश उध्दव चव्हाण रा.ढोकी ता.जि.धाराशिव, २) विनोद नाना काळे रा.ढोकी व त्यांचे इतर साथीदारांनी मिळुन चोरी केलेली असून पावटा(राजमा) चोरुन नेण्यासाठी अशोक लेलॅड कंपनीचा पिकअप चा वापर केलेला असुन चोरीचा माल पिकअपमध्ये टाकुन ढोकी ते कळबं मार्गाने अंबाजोगाई येथे घेवुन जाणार असल्याची खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन सपोनि श्री.विजयसिंग जोनवाल व स्थागुशा स्टाफ सह तात्काळ रवाना होवुन अंबाजोगाई कडे जाणाऱ्या रोडवरील माळेगाव फाटा येथे सापळा लावला तेव्हा कळंब रोडवरुन एक पिकअप भरधाव वेगात येत होता त्याला हाथ देवुन थांबण्याचा ईशारा केला पण तो न थांबता पुढे पळुन गेला तेव्हा लागलीच पिकअपचा पाठलाग करुन थोडया अंतरावर पकडुन आतील इसमांना विचारपुस केली असता त्यांनी त्यांची नावे १) रमेश उध्दव चव्हाण वय २७ वर्षे रा. ढोकी,२) विनोंद नाना काळे वय २३ वर्षे दोन्ही रा. ढोकी ता.जि.धाराशिव असे सांगितले त्यावरुन त्यांना राजमा चोरीचे कट्टे चोरीबाबत विचारपुस केली असता त्यांनी एकुण ०७ जनांनी मिळुन सदर चोरी केलेली असून त्यांनी विनोंद काळे व राहुल लाला पवार यांनी मस्साजोग येथे एक आडत दुकानाची रेखी केली व नंतर त्यांचे इतर साथीदारांनी



मिळुन रात्री चोरी करायचा प्लान केला, शंभु कारखाना येथे सर्वांनी जेवण केले व अशोकल लिलँड पिकअप ने कळंब - केज मार्गे मस्साजोग येथे राहुल याने अधिच पाहुन ठेवलेल्या आडत दुकानावर गेले तेथे एक जन रस्त्यावर पाहणीसाठी ठेवला व बाकी साथीदारांनी पक्कड व पान्हयाने दुकानाचे पत्रा नट काढुन पत्रा बाजुला करुन दुकानातील पावटा (राजमा) चे पोते दुकानाबाहेर काढुन पिकअपमध्ये टाकुन चोरी करुन गावी घेवुन गेले त्यानंतर आज रोजी शेतकरी बनवुन अंबाजोगाई येथे आडत दुकानामध्ये विकायचे होते असे कळविले वरुन दोन्ही आरोपींना त्यांचे इतर ०५ साथीदारांची नावे विचारली . त्यातील साथीदार राहुल लाला पवार हा घटनेनंतर अपघातामध्ये मयत झालेला असुन उर्वरित ०४ आरोपींचा शोध घेवुन अटक करण्यासाठी शोध सुरु आहे.

आरोपीतांचे ताब्यातुन ४२ पोते पावटा (राजमा) कि.अ.१,२६,०००/- रु व एक अशोक लेलँड कंपनीचा पिकअप कि.अं.४,५०,०००/- रु असा एकुण ५,७६,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ताब्यात घेण्यात आलेले आरोपी नामे १) रमेश उध्दव चव्हाण वय २७ वर्षे रा. ढोकी (ता,जि.धाराशीव) यांचा पुर्व अभिलेख पाहतो पो.स्टे.बार्शी, परांडा, येथे दरोडा टाकणे व दरोडयाची तयार करणे असे गुन्हे दाखल आहेत. २) विनोंद नाना काळे वय २३ वर्षे रा. ढोकी (ता.जि.धाराशिव) यांचा पुर्व अभिलेख पाहता ढोकी पो.स्टे.ला दरोडा, घरफोडी व चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

दोन्ही आरोपींना व जप्त केलेला मुद्देमाल पुढील कार्यवाहीस्तव पो.स्टे.केज यांचे ताब्यात देण्यात आलेला आहे. उर्वरित आरोपी शोध चालु आहे. पुढील तपास पो.स्टे.केज व स्था.गु.शा.बीड करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. श्री.नवनीत काँवत पोलीस अधीक्षक बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपोअ बीड, मा.श्री.चेतना तिडके अपोअ अंबाजोगाई व पो.नि. श्री.उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि विजयसिंग जोनवाल, पोउपनि महेश विघ्ने, पोउपनि हनुमान खेडकर, पोह/ महेश जोगदंड, भागवत शेलार, राजु पठाण, तुषार गायकवाड, पोअं/ बप्पासाहेब घोडके, अश्विनकुमार सुरवसे, चालक पोह/गणेश मराडे स्था.गु.शा.बीड यांनी मिळुन केली आहे.



## बीड मधील ओपन स्पेस अतिक्रमणमुक्त करण्याची उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

## नगरपालिकेच्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी समिती नेमावी: सचिन मुळूक

बीड (प्रतिनिधी)

बीडमध्ये नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्याऐवजी पालिकेच्या मालकीचे करोडो रुपयांचे ओपन स्पेस भू माफियांच्या घशात घालण्याचा डाव बीड नगरपालिकेने आखला आहे. या ओपन स्पेस वर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे. यामुळे बीड मधील सर्व ओपन स्पेस अतिक्रमण मुक्त करण्यासंदर्भात नगरपालिकेला आदेशित करावे व पालिकेतील गैर कारभाराची चौकशी करण्यासाठी समिती नेमावी अशा मागणीची निवेदन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

शहर विकासाचे नियोजन करताना नागरिकांना सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम नगरपालिकेचे असते. मात्र तसे होत असल्याचे बीडमध्ये दिसत नाही. शहरात महत्त्वाच्या ठिकाणी नगरपालिकेच्या मालकीचे ओपन स्पेस आहेत. ज्याची किंमत करोडच्या घरात आहे. या ओपन स्पेस वर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणही झालेले आहे. काहीजणांनी अतिक्रमण करून ओपन स्पेस बळकावले आहेत. पालिकेच्या सोयीस्कर भूमिकेमुळे शहरातील ओपन स्पेस वर अतिक्रमन करण्याचा उद्योग कायम सुरू असे चित्र बीडमध्ये पहावयास मिळत आहे. बीड नगरपालिकेतील वर पासून खाली पर्यंतच्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्या संगनमताने शहरातील ओपन स्पेस भू माफियांच्या घशात घालण्याचा डाव सुरू आहे. याप्रकरणी बीड शहरातील ओपन स्पेस नगरपालिकेने ताब्यात घेऊन तो अतिक्रम मुक्त करण्यासंदर्भात संबंधित यंत्रणेस आदेशित करावे व बीड नगरपालिकेतील गैर कारभाराची चौकशी करण्यासाठी चौकशी समितीने नेमावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

# शिक्षणातून मान तथा प्रसिद्धी मिळते-मौलाना कारी रफीक सिराजी

## ऑरबीट इंग्लिश स्कूल मध्ये आधुनिक शिक्षणा सोबत मूल्य शिक्षणाची जोपासना गौरवास्पद ... विनोदकुमार धुमाळ

## वरिष्ठ पत्रकार म.मुस्लिम कबीर इब्राहिमसाब सरगुरु जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

औसा (प्रतिनिधी)

येथील नबी नगर स्थित ऑबीट प्री-प्रायमरी इंग्रजी शाळेच्या मोठ्या उत्साहात वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा साजरा करण्यात आला. प्रागणांत बुधवारी ,१२ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी साढ़ेपांच वाजता मोठया उत्साहात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडला.शाळेच्या परंपरेनुसार विशिष्ठ संकल्पनेवर आधारित स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.शाळेच्या मुख्याध्यापिका शेख अंजमुनेहा इकबाल यांनी प्रास्ताविक करुन संस्थेच्या तथा शाळेच्या उपक्रमाबाबत माहिती दिली.यावर्षी विविध विषयावरील माहितीपुरक संकल्पनेवर आधारित कार्यक्रम शाळेच्या समोरील प्रांगणात सादर करण्यात आले.शिक्षण,सामाजिक ध्येय,साक्षरता,वैज्ञानिक दृष्टिकोन, संस्कृती,जबाबदारी,बालकामगार,निसर्गाबाबतची कृतज्ञता या समाजमन घडवणाऱ्या विषयावर मुलांनी सुंदर सादरीकरण केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष क़ारी रफीक सिराजी यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून विनोदकुमार धुमाळ, प्रदेश काँगेसचे सरचिटणीस अमर खानापुरे,कांग्रेस शहराध्यक्ष अज़हर हाशमी आरोग्य अधिकारी डॉ.आर.आर.शेख,काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष शेख शकीलभाई शेख संस्था अध्यक्ष अलहाज शेख आर.एम.गुरुजी, एमआयएम ज्येष्ठ नेते मुजफ्फरअली इनामदार,अलहाज हिमायत पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.सर्व मान्यवरांचा संस्थेच्या वतीने शाल व कुंडीरोपटे देऊन स्वागत करण्यात आले.त्यानंतर मौलाना कारी रफीक सिराजी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की,एवढया लहान वयात एवढं चांगलं कलाविष्कार हया लहान लेकरांनी केलं हे खरंच खूप कौतुकास्पद आहे.ह्या मुलांची कृती पाहून मला समजले की शाळा खूप चांगली आहे.येथील प्रशिक्षण तथा शिक्षण चांगले आहे.आपल्या मुलांना सुधारण्यासाठी प्रयत्न केले जातात.शिक्षणाने देश वाचेल,शिक्षणाने देश विकला जाणार नाही.त्यामुळे माणसाला माणूस बनवणारी शिकवण द्या.शिक्षणातून मान तथा प्रसिद्धी मिळते.धार्मिक शिक्षणासोबत ख-या अर्थाने व्यवाहारिक शिक्षणाची सुध्दा समाजात फार मोठी गरज आहे आणि हि गरज या संस्थेच्या वतीने पुर्ण होत आहे.त्यानंतर अमर खानापुरे,मौलाना क़ारी रफीक सिराजी,डॉ.आर.आर.शेख,यांनीही मनोगत व्यक्त करताना हे स्नेहसंमेलन केवळ नाट्य,नृत्य यांचा अविष्कार न राहता अंतर्मुख करणारे होते असे प्रतिपादन आपल्या भाषणात केले.विद्यार्थ्यांवर मूळ संस्कार हे प्राथमिक शिक्षकच करतात.आपल्या मुलांना मोबाईल व बाहय खाद्यपदार्थापासून दूर ठेवण्याचा संदेश ही मान्यवरांनी पालकांना दिला.यावेळी चिमुकल्या मुलांनी विविध कलागुण सादर केले. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीते,हदीस वाचन,मोबाईलचे दुष्परीणाम, बालकामगार,संदेश पर नृत्य अशा विविध सामूहिक नृत्यावर सादरीकरण करून पालकांची तथा उपस्थितांची मने जिंकली.संस्थेच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार म. मुस्लिम कबीर यांना इब्राहिमसाब सरगुरु जीवनगौरव पुरस्कार तर समाज सेवक सय्यद मुज़फ्फर अली ईनामदार यांना राहत खिदमत-




ए-खल्क पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.या कार्यक्रमास लातूर रिपोर्टर चे संपादक मजहर पटेल,उमर महेबुब शेख,अल्ताफ सिद्दीकी,कोंडाजी बागवान,इंजि.अजहर शेख,सैफुल्ला बागवान,,अजहर पठाण,इसाक शेख,आसेफ शेख,ऍड.मजहर शेख,,अमन शेख, परवेज शेख,आवेज शेख,गौस सय्यद,जफरअली सय्यद,उमर शेख,अमर शेख,अरबाज शेख,शिक्षिका सय्यद आयेशा,पठाण तहेनियत,पटेल तरन्नुम,शेख मुस्कान,,पठाण सूरैय्या, ,शेख रिजवाना,विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन म. मुस्लिम कबीर व प्रा.नजीर शेख यांनी केले

# वेलडन एस पी नवनीत कॉवत साहेब...

## पोलीस अधीक्षक यांनी जाहीर केल्या अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक जाहीर

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कामत यांनी आपल्या चांगल्या कामाचा धडाका सुरू केलेला आहे आता तर त्यांनी प्रत्येक पोलीस स्टेशन मधील प्रभारी अधिकारी यांना २४ तास जनसेवेसाठी हजर राहावे म्हणून नवीन मोबाईल नंबर देण्यात आलेले आहेत

चार दिवसापूर्वीच क्यू आर कोड द्वारे तक्रार आणि मत नोंदविण्यासाठी क्यूआर कोड जाहीर केले. त्या पाठोपाठ आता वरीष्ठ अधिकारी, ठाणे प्रभारी यांच्या २४ तास जनतेला संपर्कात रहाता यावे म्हणून मोबाईल क्रमांक जाहीर केले. हे उपक्रम पहाता पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे अधिकाधिक बीड पोलीस दलाला लोकाभिमुख करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत असल्याने जनतेतून आभार व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील नागरिक आणि पोलिसांचा संवाद वाढवा. सर्वसामान्य नागरिकांना पोलिसांची भीती नाही तर दिलासा मिळाला या हेतूने पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत नवनवीन उपक्रम राबवत आहेत. मागच्या कांही दिवसांपूर्वी सुरु केलेला संवाद प्रकल्प याचाच एक भाग असून प्रतिसादही चांगला मिळत आहे. आणि आता यापुढे जाऊन नवनीत कॉवत यांनी पोलिसांशी संपर्क करणे सोपे केले असून जिल्ह्यातील ठाणे प्रमुख आणि अन्य कांही पोलीस कर्मचाऱ्यांचे मोबाईल नंबर जनतेसाठी जाहीर केले असून अगदी सर्वसामान्य नागरिकांनाही पोलिसांशी थेट संपर्क करता येणार आहे. तर ते नंबर खालील प्रमाणे आहेत.

पोलीस कार्यालयाचे नाव वाटप करण्यात आलेले मोबाईल क्रमांक

अप्पर पोलीस अधीक्षक, बीड ९२२५०९२३०१, अप्पर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई ९२२५०९२८०२, पोलीस उपअधिक्षक (गृह) बोड ९२२५०९२५०९, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा ९२२५०९२३३८, प्रभारी अधिकारी, अनै.मा.वा.प्र. कक्ष, ९२२५०९२३३९, उपविभाग-बीड उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड ९२२५०९२८०३, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, बीड शहर ९२२५०९२८१०, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, शिवाजीनगर ९२२५०९२८११, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, पेठ बीड ९२२५०९२८१२, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, बीड ग्रामीण ९२२५०९२८१३, पो. स्टे प्रभारी अधिकारी, पिंपळनेर ९२२५०९२८१४, उपविभाग-गेवराई उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई ९२२५०९२८०५, पो. स्टेप्रभारी अधिकारी, गेवराई ९२२५०९२८१५,

पो.स्टे. प्रभारी अधिकारी, चकलांबा ९२२५०९२८१६, पो. स्टे.



प्रभारी अधिकारी, तलवडा ९२२५०९२८१७, उपविभाग. आष्टी उपविभागीय पोलीस अधिकारी, आष्टी ९२२५०९२८०४, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, आष्टी ९२२५०९२८१८, पो स्टे प्रभारी अधिकारी. पाटोदा ९२२५०९२८१९, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, अंभोरा ९२२५०९२८२०, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, शिरुर ९२२५०९२८२१, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, अंमळनेर ९२२५०९२८२२, उपविभाग-अंबाजोगाई उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबाजोगाई ९२२५०९२८०७, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, अंबाजोगाई शहर ९२२५०९२८२३, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, अंबाजोगाई ग्रामीण ९२२५०९२८२४, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, परळी शहर ९२२५०९२८२५, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, परळी ग्रामीण ९२२५०९२८२६ पो.स्टे. प्रभारी अधिकारी, संभाजीनगर परळी, ९२२५०९२८२७, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, बर्दापूर ९२२५०९२८२८, उपविभाग - माजलगाव उपविभागीय पोलीस अधिकारी, माजलगाव ९२२५०९२८०६, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, माजलगाव शहर ९२२५०९२८२९, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, माजलगाव ग्रामीण ९२२५०९२८३०, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, दिंद्रूड ९२२५०९२८३१, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, वडवणी ९२२५०९२८३२, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, सिरसाळा ९२२५०९२८३३, उपविभाग- केज उपविभागीय पोलीस अधिकारी, केज ९२२५०९२८०८, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, केज ९२२५०९२८३४, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, धारुर ९२२५०९२८३५, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, नेकनूर ९२२५०९२८३६, पो.स्टे. प्रभारी अधिकारी, यु. वडगाव ९२२५०९२८३७

# संजय भैय्या सोनवणे म्हणजे. वंचित शोषितांना व युवकांना न्याय देणारा संघर्ष योद्धा .....!!

गेवराई (प्रतिनिधी)

आमचे प्रेरणास्थान लाखो युवकांचे सर्वस्व बहुजनांचा आधार फुले शाहू आंबेडकरांच्या विचारधारेवर चालणारे नेतृत्व बहुजनांचे नेते महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष सन्मानिय संघर्ष योद्धा संजय भैय्या सोनवणे हे व्यक्तिमत्व म्हणजे कुठलीही राजकीय वारसां नसताना फुले शाहू आंबेडकर छत्रपती शिवराय साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या विचाराने प्रेरित झालेल्या यूवा नेते संघर्ष योद्धा संजय भैय्या सोनवणे होय पुणे जिल्ह्यातील तालुका इंदापूर या शहरांमधून आपल्या सामाजिक कार्यास सुरुवात करणारे संजय भैय्या सोनवणे संपूर्ण महाराष्ट्र मध्ये भैय्या या नावाने प्रसिद्ध आहेत महाराष्ट्र मध्ये ज्या ज्या ठिकाणी बहुजन समाजावर अन्यायअत्याचार होत असेल त्या त्या ठिकाणी सर्वप्रथम जाऊन पीडीतांना भेटून न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात आत्तापर्यंत त्यांनी शोषित घटक युवक कामगार शेतकरी वर्ग युवक वर्ग यांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक आंदोलन केली महाराष्ट्रातील सर्वात मोठ आंदोलन त्यांनी सरडेवाडी टोल नाका येथील कामगारावरील होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात आंदोलन करून कामगारांना न्याय मिळवून दिला. त्यांच्या प्रयत्नांतून आत्तापर्यंत त्यांनी सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी शासकीय योजनेतून शंभर पेक्षा जास्त बोलेरो पिकप चे वाटप केले आहे महाराष्ट्रातील असंख्य सुशिक्षित बेरोज युवकांना आपल्या पायावर उभा करून छोटा मोठा व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन पर मदत केली आहे



महाराष्ट्रातील सर्व अठरा पगड जातींना सोबत घेऊन जाणारे नेतृत्व म्हणजे संजय भैय्या सोनवणे म्हणतात की आपण भविष्यात वंचित शोषित शेतकरी महिला व विद्यार्थी यांना योग्य न्याय देऊन व त्यांना हक्काचं व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असलेले नेतृत्व आहेत आशा ह्या युवा नेतृत्वास त्यांच्या १४ फेब्रुवारी अभिष्टचिंतन सोहळा दिनानिमित्ताचे अवचित्य साधून त्यांना नव्या जोमाने बांधिलकी जोपासून कार्यरत राहतील अशी तथागत भगवान गौतम बुद्धांच्या चरणी मंगल कामना करतो व पुढील कार्यास मनपूर्वक शुभेच्छा देतो

विकास गायकवाड

महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष बीड जिल्हा अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य

लेख :- शेख खाजा निजाम

# संत तुकाराम महाराजांचा विचार मधुकर खाडे यांनी अंगिकारला

## ह.भ.प.विनोद महाराज तपसे यांचे प्रतिपादन; होळ येथे किर्तन सप्ताहास प्रारंभ

प्रतिनिधी । केज

परिस्थिती बिकट असताना मधुकर खाडे महाराज यांनी स्वतःला वारकरी संप्रदायात वाहून घेतले. त्यांनी आयुष्यभर संत तुकाराम महाराजांचा विचार अंगिकारला, असे प्रतिपादन बीड तालुक्यातील आहेरवडगाव येथील स्वामी मनसुळनाथ गडाचे महंत ह.भ.प. विनोद महाराज तपसे यांनी व्यक्त केले.

वै.पै.मधुकर खाडे महाराज यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यानिमित्ताने केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह आयोजित केला आहे. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असलेले ह.भ.प. विनोद महाराज तपसे हे गुरुवारी (दि.१३) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. यावेळी होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री यांच्यासह आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. किर्तन सेवेसाठी 'धन्य ते संसारी । दयावंत जे अंतरी ।। तेथे उपकारासाठी । आले घर ज्या लटिके वचन । नाही देही उदासीन ।। मधुरा वाणी ओठी। तुका म्हणे वाव पोटी ।।' हा संत तुकाराम महाराज यांचा अभंग घेतला होता. ह.भ.प. विनोद महाराज तपसे म्हणाले, मधुकर खाडे महाराज यांनी संत तुकाराम महाराजांचा विचार अंगिकारला होता. त्यांनी वारकरी संप्रदाय, कुस्ती, राजकीय क्षेत्रात कार्य केले. वसुधैव कुटुंबकम या उक्तीप्रमाणे ते आयुष्य जगले. प्रत्येक व्यक्ती हा माझाच आहे, असा नेहमी त्यांच्याकडे भाव असायचा. ते अजातशत्रू व्यक्तीमत्व होते. परिस्थिती बिकट असताना वारकरी संप्रदायात वाहून घेतले. स्वतःच्या कुटुंबाकडे दुर्लक्ष केले मात्र वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी उपाशी राहू दिला नाही. संत जोग महाराज यांची पुण्यतिथी असल्याने महाराजांनी नामस्मरण केले. जोग महाराजांनी वारकरी परंपरा समृध्द केली. त्यांच्या संस्थेतून संप्रदायाचा विस्तार झाला. त्या संस्थेमुळे एक शाखा होळ येथे निर्माण होऊ शकली. अभंगावर विवेचन




करताना विनोद महाराज तपसे म्हणाले, संतांनी समाज जागृती करून दिशा दाखवण्याचे काम केले. त्यांचे समाजावर उपकार आहेत. संत कधीही खोटे बोलत नाहीत. अगदी संतांप्रमाणे मधुकर खाडे महाराज हे आपले जीवन जगले. त्यांची स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे मत व्यक्त केले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ह.भ.प.महादेव महाराज बोराडे यांचे किर्तन

होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेत कार्यरत असताना औरंगपूर (ता.केज) येथील पावनधाम संस्थानचे प्रमुख ह.भ.प.महादेव महाराज बोराडे यांना मधुकर खाडे महाराज यांचा सहवास लाभला. त्यांच्या गंगापूजनानिमित्त आयोजित कीर्तन सप्ताह शनिवारी (दि.१५) ह.भ.प.महादेव महाराज बोराडे यांची किर्तन सेवा होणार आहे.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आज बैठक

## कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे -जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के

बीड /प्रतिनिधी

आज दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ वार शनिवार रोजी सकाळी ११ वा.राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांची महत्त्वपूर्ण बैठक राष्ट्रवादी भवन बीड येथे होत आहे, याप्रसंगी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.या जिल्हा कार्यकारणी व कार्यकर्ता बैठकीसाठी बीड लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार बजरंग बप्पा सोनवणे आमदार संदीप भैया शिरसागर व जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या उपस्थिती संपन्न होणार आहे.

आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगर पंचायत नगरपालिका निवडणुकी संदर्भात पदाधिकारी कार्यकर्ते महत्त्वपूर्ण बैठक संपन्न होणार आहे. तरी या बैठकीसाठी आमदार, माजी आमदार, जिल्हा पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, सरपंच,सह कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.



# संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील निराधारांचे अनुदान तात्काळ वितरीत करा

आ.संदीप क्षीरसागरांचे तहसिलदारांना निर्देश

बीड (प्रतिनिधी):- संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी या व अशा प्रकारच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान तात्काळ वितरीत करण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तहसिलदार यांना दिले आहेत.

बीड विधानसभा मतदारसंघातील बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर कासार तालुक्यातील लाभार्थ्यांना गेल्या अनेक दिवसांपासून संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना या सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान मिळालेले नाही. या योजनेचे लाभार्थी म्हणजे गरजू, निराधार आणि दुर्बल असतात. त्यांचे जीवनमान या अनुदानावर अवलंबून असते. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांचे लाभार्थ्यांना अनुदान मिळाले नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सदरील योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांना मिळणाऱ्या अनुदानाची रक्कम तात्काळ वितरीत करा



# विद्यार्थ्यांनी नेहमी अव्वलस्थानी राहण्याच्या ध्येयाने प्रयत्न केले पाहिजे- अरविंद जगताप

अंबाजोगाई / प्रतिनिधी

येथील योगेश्वरी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक ८ ते १० फेब्रुवारी दरम्यान यशस्वीपणे संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण व समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संवेदनशील लेखक,चला हवा येऊ या खळखळून हसवणाऱ्या कार्यक्रमातील ज्यांच्या संवेदनशील पत्रलेखनाने सर्वांच्या डोळ्यात पाणी आणले असे मराठी चित्रपट पटकथा व संवाद लेखक मा. अरविंद जगताप यांना आमंत्रित करण्यात आले होते. अरविंद जगताप यांनी आपल्या भाषणाद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरित केले. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी नेहमी अव्वलस्थानी राहण्याच्या ध्येयाने प्रयत्न केले पाहिजे असे प्रतिपादन केले. प्रत्येकाने नेतृत्व करण्याची क्षमता स्वतः मध्ये विकसित केली पाहिजे. विद्यार्थ्यांनी खरकटे होण्यात आपले आयुष्य घालवू नये आणि कोणाचीतरी चमचेगिरी करण्यात धन्यता मानु नहा असा संदेश दिला. त्यांनी चला हवा येवू द्या मधील बापयावरील पत्र वाचून उपस्थितांना भावूक केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव मा. कमलाकरराव चौसाळकर यांनी भुषवले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी योगेश्वरी महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च पदावर कार्यरत असल्याचे सांगून महाविद्यालयाच्या यशाची ही परंपरा आपण पुढे चालू ठेवावी व ती वाढवावी असे आवाहन करून सर्व विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी यासाठी अधिकाधिक प्रयत्न करावेत अशा भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी, कार्यकारी उपाध्यक्ष ड. जगदीश चौसाळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्हि. कानेटकर, उपप्राचार्य डॉ. आर.व्ही. कुलकर्णी, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. अनिल नरसिंगे, आय. क्यू.ए. सी. समन्वयक डॉ.सचिन कळलावे, डॉ. महेंद्र आचार्य, विद्यार्थी प्रतिनिधी कु.ईश्वरी खाडे यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्हि. कानेटकर यांनी आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाने गेल्या वर्षभरात राबविलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला.सूत्रसंचालन कु. श्रेया कोंडपल्ले व अक्षता मुळे या विद्यार्थिनींनी केले. आभार प्रदर्शन स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. अनिल नरसिंगे यांनी केले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आयोजित युवा महोत्सवात शास्त्रीय नृत्य या कलाप्रकारात प्रथम आल्याबद्दल महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. ईश्वरी खाडे या विद्यार्थिनीचा तसेच युवा महोत्सवात शॉर्ट टेलिफिल्म मध्ये तृतीय क्रमांक मिळाल्याबद्दल यश केंद्रे, निखिल यादव, ईश्वरी खाडे, दीपक उखंडे, निखिल जाधव या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांना व स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT